# <u>स्व-दान</u>

एक उद्यान असे असावे, जिथे स्व-दानाचेच फक्त फळ मिळावे.

पायाखाली हिरवागार गवताचे सुंदर व थंड गार गालीचे असावे.

डोक्यावरील सूर्य-किरण पानांच्या जाळीतून हळूच लपत-छपत यावे.

भवताली सुमन-गंधीत हवेचे कर्ण मुग्ध संगीत अलगद लहरावे.

पाषाणाचा तबला बनवून, जलानेही ताल-ठेक्यात झुळत वहावे.

निसर्गाच्या सानिध्यात, आत्म्याने मनासोबत क्षणिक फिरावे.

शरीराचा भास नाही, मृत्यूने ऱ्हास नाही, बंधन मुक्त कर्म असावे ,

जीवन- सार अनुभवत क्षण भंगुर आयुष्य संस्मरणीय करावे.

एक उद्यान असे असावे, जिथे स्व-दानाचेच फक्त फळ मिळावे.